# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 26.10.2026** **वार : सोमवार**

---

## ठळक बातम्या

1. बाराव्या ब्रिक्स संसदीय मंचाची आज नवी दिल्लीत सुरुवात; पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार.
2. दहशतवादाचा वापर राष्ट्रीय धोरण म्हणून करणं अस्वीकार्य आहे; परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांची स्पष्टोक्ती.
3. 2029 पर्यंत अंतराळ मोहिमांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर करणार असल्याची इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांची माहिती.
4. महिला क्रिकेटमध्ये झिम्बाब्वेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत भारताची विजयी आघाडी.

## सविस्तर बातम्या

### ब्रिक्स संसदीय मंच

बाराव्या ब्रिक्स संसदीय मंचाची सुरुवात आज नवी दिल्लीत होत आहे. 'जन-केंद्रित विकासासाठी संसद' अशी या कार्यक्रमाची संकल्पना आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेला आज पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. विविध देशांतून आलेल्या शिष्टमंडळांच्या नेत्यांची ते भेट घेतील. या कार्यक्रमासाठी ब्रिक्स सदस्य देशांसह 10 भागीदार देशांना आमंत्रित करण्यात आलं असून, या देशांची संसदीय शिष्टमंडळे बैठकीत सहभागी होणार आहेत.

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला हे या मंचाचे अध्यक्ष आहेत. विविध देशांच्या शिष्टमंडळ प्रमुखांशी ते द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. ब्रिक्स सदस्य आणि भागीदार देशांच्या संसदेतील 'आंतरराष्ट्रीय व्यवहार समित्यांच्या' अध्यक्षांची एक विशेष बैठकही या अंतर्गत होणार आहे. यामध्ये संसदीय मुत्सद्देगिरी, क्षमता बांधणी आणि एकमेकांच्या सर्वोत्तम कार्यपद्धतीच्या देवाणघेवाणीवर सविस्तर चर्चा केली जाईल.

### मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीवरील 'मन की बात' च्या 139 व्या भागातून काल देशवासियांशी संवाद साधला. स्वच्छता, पर्यावरणाप्रती जागरुकतेच्या भावनेतून समाज एकजूट झाला की बदल नक्कीच घडतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी स्वच्छता अभियान सुरू असल्याचं सांगून, आसपासचा परिसर स्वच्छ ठेवण्याच्या लहानश्या प्रयत्नांतून मोठे बदल घडत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

व्होकल फॉर लोकलच्या पुढाकारातून देशांतर्गत उत्पादनं आता परदेशी बाजारात उपलब्ध होत आहेत. महाराष्ट्र सरकारच्या आदिवासी विकास विभागाचा उपक्रम असलेल्या शबरी नॅच्युरल्सचा उल्लेख मोदी यांनी मन की बातमध्ये केला. यंदाच्या सणासुदीच्या काळात स्थानिक कारागिरांनी तयार केलेल्या उत्पादनांना अधिक प्राधान्य द्यायचं आवाहनही त्यांनी केलं.

**पंतप्रधान-ओडीसा**

भारताची बँकिंग यंत्रणा आज जगातल्या सर्वात सशक्त बँकिंग यंत्रणांपैकी एक आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ओडिसामधील भुवनेश्वर इथं भारतीय रिझर्व्ह बँकेचं डेटा सेंटर आणि सायबर सुरक्षा प्रशिक्षण संस्थेचं च्या उद्घाटन काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. डिजिटल इंडियानं बँकिंग प्रत्येक नागरिकापर्यंत नेलं आणि प्रत्येक नागरिक लाभार्थी झाला आहे, असं ते म्हणाले. कारागीर, गरीब, स्त्रिया अशा सर्व समाजघटकांना बँकांनी मदतीचा हात दिल्याचं मोदी यांनी सांगितलं.

वाराणसी इथल्या नमो घाटावर विंग्ज ओव्हर गंगा या मेगा एअर शोला ही पंतप्रधांन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याआधी प्रधानमंत्र्यांनी वाराणसीत एका कापड उत्पादन केंद्राचं उद्घाटन केलं आणि तिथल्या महिला कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

**उपराष्ट्रपती-आंध्र दौरा**

उपराष्ट्रपती सी .पी. राधाकृष्णन आजपासून २ दिवसांच्या आंध्र प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. विजयवाडा इथल्या डॉक्टर एन टी आर आरोग्य विज्ञान विद्यापीठातील एका कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत. तिरुपती इथल्या श्री वेंकटेश्वर स्वामी मंदिर आणि तिरुचनूर येथील श्री पद्मावती अम्मावारी मंदिरांना देखील ते भेट देणार आहेत.

**एस. जयशंकर**

दहशतवादाचा वापर राष्ट्रीय धोरण म्हणून करणं पूर्णपणे अस्वीकार्य आहे आणि त्याचे समर्थन करणं शक्य नाही असं परखड मत परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी व्यक्त केलं. सर्वच देश दहशतवादाविरोधात 'शून्य सहनशीलता' हे धोरण अवलंबत नाहीत त्यामुळेच दहशतवादाचा धोका संपत नाही असं ते म्हणाले. नवी दिल्लीत 'चिन्मय मिशन'च्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते.

जगानं या धोक्याबाबत अधिक सजग होणं आवश्यक असून सर्व प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी एकत्र येणं गरजेचं असल्याचं जयशंकर म्हणाले. भारत शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील आहे आणि शांततेसाठी अन्य देशांबरोबर काम करण्यासही तयार आहे असं ते म्हणाले. संयुक्त राष्ट्रांनी जागतिक संकटांच्या वेळी केवळ बघ्याची भूमिका न घेता नेतृत्वाची भूमिका बजावली पाहिजे असं ठाम प्रतिपादन त्यांनी केलं.

**खर्गे टीका**

कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दिवंगत वडिलांबाबत केलेल्या कथित विधानांवर केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी जोरदार टीका केली आहे. जेव्हा जेव्हा कॉंग्रेस नेत्यांनी पंतप्रधान मोदी किंवा त्यांच्या कुटुंबाबद्दल अशी विधानं केली आहेत, तेव्हा जनतेनं कॉंग्रेसला चोख आणि कडक प्रत्युत्तर दिलं आहे असंही त्यांनी नमूद केलं.

कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केलेल्या अपमानास्पद टिप्पणीच्या निषेधार्थ, भारतीय जनता पक्ष आज सर्व राज्य मुख्यालयांमध्ये देशव्यापी निदर्शनं करणार आहे. या आक्षेपार्ह टिप्पणीबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॉंग्रेसला फटकारलं आहे. कॉंग्रेसच्या अंतस्थ वर्तुळातील भावनाच खर्गेंच्या वक्तव्यातून समोर आल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**अंतराळ मोहीम**

2029 सालापर्यंत भारत आपल्या अंतराळ मोहिमांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर करणार असून, त्यासाठी चार प्रक्षेपण केंद्र उपलब्ध असतील असं इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी म्हटलं आहे. यामध्ये तामिळनाडूच्या तुतिकोरिन जिल्ह्यातील कुलसेकरपट्टिनम इथं 2 हजार एकर जागेवर उभारले जाणारं SSLV म्हणजे लहान उपग्रह प्रक्षेपणाची सुविधा असलेलं संकुल आणि श्रीहरीकोटा इथल्या तिसऱ्या प्रक्षेपण केंद्राचा समावेश आहे. उपग्रह प्रक्षेपणाची जागतिक मागणी पूर्ण करण्यासाठी हा विस्तार करण्यात येत आहे असं नारायणन यांनी सांगितलं. चेन्नईजवळील पोरूर इथल्या एका खाजगी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ते काल बोलत होते. इस्रो पुढील दोन महिन्यांत 'गगनयान' मोहिमेची पहिली मानवरहित चाचणी घेणार आहे त्यानंतर, अंतराळवीरांना घेऊन जाणाऱ्या मोहिमेपूर्वी आणखी 2 मानवरहित चाचण्या केल्या जातील अशी माहिती त्यांनी दिली. नारायणन यांनी 'चंद्रयान-5' मोहिमेबद्दलही माहिती दिली.

**ब्राझील-निवडणूक**

ब्राझीलमधील अध्यक्षीय निवडणुकीत लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा यांनी फ्लाव्हिओ बोल्सोनारो यांचा पराभव करत विजय मिळवला आहे. कामगार युनियनचे माजी नेते असलेले 80 वर्षीय लुला, पुढच्या वर्षी 5 जानेवारीला अध्यक्षपदाची शपथ घेतील. लुला यांनी आतापर्यंत 7 वेळा अध्यक्षपदाची निवडणूक लढवली असून, ते 4 वेळा विजयी झाले आहेत.

**सौदी-अरेबिया-विमानतळ**

सौदी अरेबियानं रियाधमधील किंग खालिद आंतरराष्ट्रीय विमानतळ आजपासून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी पुन्हा खुला केला आहे. मात्र सध्याची सुरक्षा परिस्थिती पाहता, भारतीय विमान कंपनी 'इंडिगो'नं या प्रदेशातील त्यांची सर्व उड्डाणे या महिन्याच्या 31 तारखेपर्यंत बंद राहतील असं म्हटलं आहे.

**<u>वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप</u>**

2029 मध्ये होणाऱ्या 'सीनिअर वर्ल्ड वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप'चं आयोजन अहमदाबादमध्ये केलं जाईल असं आंतरराष्ट्रीय भारत्तोलन संघ म्हणजे IWF नं जाहीर केलं आहे. चीनमधील निंगबो इथं झालेल्या IWF कार्यकारी मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

**<u>फ्रेंच ओपन-बॅडमिंटन</u>**

फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, पी. व्ही. सिंधुला काल उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. जागतिक क्रमवारीत प्रथम क्रमांकावर असलेल्या दक्षिण कोरियाच्या से-यंग बरोबर झालेल्या सामन्यात सिंधुनं कडवी झुंज दिली.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये,काल रात्री वडोदरा इथं खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यात भारतानं  झिम्बाब्वेचा 121 धावांनी पराभव केला. भारतीय संघानं दिलेल्या 328 धावांच्या लक्षाचा पाठलाग करताना झिम्बाब्वेच्या संघाला केवळ 207 धावाच करता आल्या. भारताच्या दीप्ती शर्मा हीनं नाबाद 106 तर हरमनप्रीत कौरनं सर्वाधिक 126 धावा केल्या. दीप्ती शर्मानं 3 तर वैष्णवी शर्मानं चार बळी घेतले. हरमनप्रीत कौर सामनावीर ठरली. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातला तिसरा आणि अंतिम सामना येत्या बुधवारी होणार आहे.

**<u>हवामान</u>**

बंगालच्या उपसारातल्या कमी दाबाच्या पट्ट्याचं आज चक्रीवादळात रुपांतर होईल असं हवामान विभागानं म्हटलं आहे. पुढचे 2 दिवस बंगालच्या उपसागरालगतच्या भागातील मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये असा सल्ला हवामान विभागानं दिला आहे. या वादळामुळे आंध्र, ओडिशा, छत्तीसगड राज्यात मुसळधार ते अतीमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

या चक्रीवादळाचा सामना करण्यासाठी ओडिशा सरकारनं आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवली आहे. राज्याच्या दक्षिण भागातल्या जिल्ह्यांना  मुसळधार पावसाचा लाल बावटा देण्यात आला आहे.
केरळमध्ये कालच्या तुलनेत आज पावसाची तीव्रता कमी होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.